जनमाध्यम दि. ०६/०१/१५

# रिसर्च फॉर रिसर्जन आंतरराष्ट्रीय परिषद फेब्रुवारीत

## विद्यापीठात माहितीसाठी पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनपूर्व बैठक

**अमरावती/का.प्र.**

नागपुरातील व्हीएनआयटीमध्ये फेब्रुवारीत होऊ घातलेल्या रिसर्च फॉर रिसर्जन या विषयावर आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेची पूर्वतयारी म्हणून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात बैठक पार पडली. नागपूरच्या विश्वेश्वरैया प्रौद्योगिकी संस्थेत (व्हीएनआयटी) भारतीय शिक्षण मंडळ नागपूरच्या यजमानपदाखाली ही आंतरराष्ट्रीय परिषद होणार आहे.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नॅशनल एन्व्हायर्नमेंटल इंजिनिअरिंग रिसर्च इस्टिट्यूट निरी, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला, कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेक, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद आयोजिण्यात आली आहे. संशोधनाला चालना मिळावी हा या आंतरराष्ट्रीय परिषदेमागील उद्देश आहे.

या परिषदेत भारतीयांच्या सर्वांगीण दृष्टिकोनाच्या बाबींचा अभ्यास, छोट्या छोट्या



बाबींवर होणाऱ्या नावीन्यपूर्ण संशोधनावर भर देणए, त्याचे डॉक्युमेंटेशन करणे, संशोधनाची उपयोगिता व योगदानाला प्रोत्साहन देणे, नेटवर्किंग रिसर्च, आंतरशिस्त विद्याशाखेअंतर्गत संशोधनाला उत्तेजन आणि जीवनाचा सखोल व व्यापक अर्थ विस्तारित करणे हा असून या परिषदेसाठी शिक्षण, विज्ञान व तंत्रज्ञान, अर्थशास्त्र पर्यावरण, भारतीय ज्ञानपद्धती, मानवशास्त्र, शैक्षणिक सुधारणा यावर मंथन करण्यात येणार असल्याची माहिती परिषदेचे संयोजक डॉ. उज्वला चक्रदेव यांनी पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन द्वारा विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सभागृहात आयोजित सभेत दिली.

परिषदेचे संयोजक सचिव डॉ.अरविंद जोशी यांनी माहिते देताना सांगितले, देशविदेशातील नामवंत संशोधक, ४० विद्यापीठांचे कुलगुरु, राज्यपाल कार्यालयातील शिक्षण व संशोधन कार्याचा प्रभार असलेले अधिकारी, विविध राज्यातील उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांतर्फे तेथील उच्चपदस्थ अधिकारी, युजीसी, एआयसीटीई यांसह आदी उपस्थित राहणार आहेत.

नावीन्यपूर्ण संशोधन सादर करण्यासाठी या आंतरराष्ट्रीय परिषदेत जास्तीत जास्त संशोधकांनी पुढे यावे, असे आवाहन प्रकुलगुरु डॉ.जयकिरण तिडके यांनी केले. सभेचे संचालन नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ.विलास सपकाळ यांनी केले. तर बीसीयूडी संचालक डॉ. राजेंद्र सपकाळ यांनी आभार मानले.